पूर्ण नाव: पराग श्रीराम वंजारी
फार्मचा पत्ता: पी.डब्लू.डी.फार्म्स, बिना संगम
घरचा पत्ता: सी-०४, फ्ल्याट २०२, पायोनीर रेजन्सी, के.टी. नगर, नागपूर-१३.
मोबाईल क्र.: ९८८१०९३२२०
इमेल आय डी.: parag.97333@gmail.com
शिक्षण: एम.ई. डिझाईन इंजिनीअरिंग
जन्म तारीख: २०/०६/१९८०
वय: ४० वर्ष



2. **कुटुंबाची माहिती-** भंडारा जिल्ह्यातील लाखनी हे त्याचं मुळ गाव होत. लहानपणापासूनच त्यांच्याकडे गाई म्हशी तसेच ५ ते ५० कोंबड्या नेहमीच असायच्या. त्यामुळे त्यांना कोंबडीच संगोपन कसे करायचे याबाबद थोडी फार माहिती व आवडही होती.

3 **नोकरी माहिती** - नागपूर येथील श्री. पराग वंजारी हे व्यवसायाने डिझाईन इंजिनियर असून त्यांनी गलेलठठ पगाराची नोकरी असताना कुक्कुटपालन सुरु करण्याचे निश्चित केले.

4 **सद्यस्थिती आणि प्रशिक्षण माहिती** - २०१६-१७ दरम्यान त्यांनी प्रायव्हेट कंपनीमधील नोकरी सोडली व स्वबळावर स्टील डीझायानिंगच्या व्यवसायासोबतच कुक्कुटपालन करण्याचे ठरविले. व्यावसायिकदृष्ट्या त्यांनी कुक्कुट पालनाची सुरुवात ५०० देशी कोंबड्यांपासून परंतु त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या महत्वाची माहिती नसल्याने त्यांना फारसा लाभ झाला नाही तसेच मरतुकीचे प्रमाण जास्त झाल्याने व विक्रीसंबंधी पुरेशी माहिती नसल्याने त्यांची या व्यवसायात निराशा झाली. परंतु खचून न जाता त्यांनी त्यांचे कुक्कुटपालनाचे यशस्वी प्रयत्न सुरु ठेवले. याचदरम्यान त्यांनी नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालया अंतर्गत असणाऱ्या कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्रामध्ये डॉ. मुकुंद कदम व डॉ. दर्शना भैसारे यांच्याकडून पाच दिवसीय व्यावसायिक कुक्कुटपालन या विषयावर प्रशिक्षण घेतले.

5. **व्यवसाय कधी सुरु केला-** प्रशिक्षण पूर्ण होताच त्यांनी नागपूर मधील बिना संगम येथे शेतजमीन लीजवर घेऊन कोंबड्यासाठी शेड बांधले, बँकेकडून कर्ज काढले व ५ लाखांची गुंतवणूक करून कडकनाथ या देशी कोंबडीची ५०० पिल्ले विकत घेतली व देशी कुक्कुटपालनास सुरुवात केली. तसेच त्यांनी १०० अंडी कॅपासीटीचे अंडी उबवणी यंत्र घरीच तयार केले व त्याचा वापर घरच्या घरीच कडकनाथ कोंबडीचे अंडी उबवण्यासाठी करतात.

6. **घरातील लोकांची मदत**- अंडी उबवणी करतानाच्या प्रक्रियेत अंड्यांचे वर्गीकरण करणे, त्यांना स्वच्छ करणे, कॅन्ड्लिंग करणे इत्यादी कामे वंजारी यांच्या पत्नी करतात.

7 **सद्यस्थिती आणि उत्पन्न** - सद्यस्थितीत कडकनाथ व असील या जातीचे प्रत्येकी २००० पक्षी त्यांच्याकडे उपलब्ध असून, त्यांचे फलित अंडे, एक दिवसीय पिल्ले व मोठे पक्षीसुद्धा विक्रीसाठी उपलब्ध असतात. सध्या दररोज ३५० ते ४०० अंड्याच उत्पादन होतो व त्यापैकी २०० अंडी फलित निघतात. टेबल अंडी १५ रु. प्रती अंडा तर फलित अंडी २० ते २५ रु. प्रती अंडा याप्रमाणे विकतात. अंड्याचे उत्पादन कमी झाले कि नर पक्षी ५०० रु. प्रती किलो तर मादा पक्षी ३५० ते ४०० रु. प्रती किलो याप्रमाणे विकतात. सुरुवातीला त्यांना विक्रीसाठी ग्राहक मिळत नव्हते. त्यांनी सोशल मिडीयावर तसेच नागपूरमधील प्रत्येक हॉटेल, रेस्टोरंट, जिम, धाबा इत्यादी

ठिकाणी जाऊन स्वतःच्या फार्मबद्दल पब्लिसिटी केली यामुळे त्यांना खूप फायदा झाला व आताच्या घडीला त्यांच्याकडे बुकिंगद्वारे विक्री होते. सध्या दर महिन्याला त्यांना ५० ते ६० हजार रुपये कुक्कुटपालनातून मिळतात.

8 **यशाचे सूत्र आणि भविष्यातील नियोजन** –भविष्यात त्यांना देशी पक्ष्यांची संख्या तसेच अंडी उबवणी यंत्राची संख्या वाढवायची आहे जेणेकरून ते पक्ष्यांच्या वाढत्या डिमांड ला स्वतः पूर्ण  करू शकतील व त्यातून जास्तीत जास्त नफा कमवू शकतील.

9 **प्रशिक्षणाचा फायदा** – प्रशिक्षणामध्ये त्यांना कोंबड्यांच्या विविध जाती, त्यांचे खाद्य व्यवस्थापन, ब्रूडिंग व्यवस्थापन, लसीकरण वेगवेगळया रोगांचे निवारण, शवविश्चेदन, औषधी, इत्यादी विविध विषयांवर मार्गदर्शन मिळाले.

10 **राहणीमानात फरक** – सध्या दर महिन्याला त्यांना ५० ते ६० हजार रुपये कुक्कुटपालनातून मिळतात. या व्यवसायात त्यांनी स्वतःसोबतच दोन व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.

11. **युवकांना सल्ला यशाचे श्रेय** – पुढील युवा पिढीला ते सल्ला देतात कि कुठलाही व्यवसाय करताना संयम बाळगावा. कुक्कुटपालनामध्ये कुठल्या गोष्टीला जास्त डिमांड आहे हे ओळखून स्वतः सर्वेक्षण करावे , मार्केटची स्थिती पहावी व त्यानंतरच ठामपणे निर्णय घ्यावा व अखेरपर्यंत स्वताच्या निर्णयावर ठाव राहावे.

**12.मार्गदर्शकाचे नाव:**

**१. डॉ. मुकुंद एम. कदम**
सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८८८८८३६३७४
**२. डॉ. दर्शना बी. भैसारे**
सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८४३९७८७६२२